N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर　　**P.S.(ठाणे):** शिवाजी नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0649　　**Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/10/2023 02:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 16/10/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/10/2023
**Time From (वेळेपासून):** 15:48 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/10/2023　　**Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 009

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/10/2023 02:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी　　**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण,कंपनी मर्या विभागीय , कार्यालयाचे इमारतीमध्ये,सुंदर बागेजवळ, इचलकरंजी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विजय आण्णाप्पा यादव

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** आण्णाप्पा यादव 9

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):** 1

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन क )** 1

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

1

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 13/894/2, ,संतमळा, इचलकरंजी,हातकणंगले,शिवाजी नगर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 13/894/2, ,संतमळा, इचलकरंजी,हातकणंगले,शिवाजी नगर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9422337979

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुयोग दिनकर पाटणकर | | वडील का नाम : दिनकर पाटणकर | 1. खासबाग मैदान जवळ, मंगळ पेठ,कोल्हापूर,शिवाजी नगर, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | रविंद्र बापुस बिरनाळे | | वडील का नाम : बापुसो बिरनाळे | 1. अमराई रोड, शिक्षक कलनी इचलकरंजी,,हातकणंगले , शिवाजी नगर,कोल्हापुर,मह भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक - 18/10/2023 मी विजय आण्णाप्पा यादव, वय- 45 वर्षे, व्यवसाय - बांधकाम व्यावसायिक रा. 13/894/2, संतमळा, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. मो. नं. 9422337979.समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 16/10/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना फोन करून माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, मी राहते घराचे ग्राऊंड फ्लोवरवरती माझे पॉवरलुम होते. त्यासाठी महावितरणकडुन औद्योगिक परवाना लाईट सन 2003 चे दरम्यान जोडणी करून घेतली होती. त्यानंतर माझे पॉवरलुम मी 2019 मध्ये बंद केले.त्यानंतर माझे गोडावुन रिकामे होते. 1 फेब्रुवारी 2023 पासुन मी माझे गोडावुन आकाश भुतडा यांना द्रोण पत्रावळी ठेवणेसाठी करारकरून औद्योगिक परवाना लाईटचे वापरासह भाड्याने दिला दिनांक 02/09/2023 रोजी महावितरण कार्यालय आवाडे मळा इचलकरंजी येथील कळसुरे साहेब व त्यांचा स्टाफ येवुन माझे औद्यागिक मीटरची पाहणी करून गेले होते. त्यानंतर मला महावितरण 'अ' उपविभागीय कार्यालय, इचलकरंजी यांचे कार्यालयातुन दिनांक 02/09/2023 रोजी 126 कलमानुसार मला औद्यगिक मीटरचे वीज वापर अनाधिकृतपणे केला आहे म्हणुन 1,22,678/-रू रक्कम भरणेबाबत नोटीस आली होती. त्यानंतर सदर नोटीसबाबत माझी सुनावणी महावितरण 'अ' उपविभागीय कार्यालयात तिन वेळा पाटणकर साहेब यांचेसमोर झाली त्यावेळी तेथे बिरनाळे साहेब ही होते. सुनावणी झालेनंतर काय निर्णय झाला ते कळवित असल्याचे त्यांनी सांगितले होते. त्यानंतर दिनांक 12/10/2023 रोजी मला बिरनाळे साहेब यांनी फोन करून त्यांचे कार्यालयाचे बाहेर बोलावुन घेवुन त्यांनी मला तुम्हाला पाच वर्षाचा झालेला लाखभर रूपये दंड कमी करून फक्त एक वर्षाचा अंदाजे 19,000/- रूपये दंड केला आहे परंतु तुम्ही पाटणकर साहेब व माझ्यासाठी 41,000/- रूपये असे एकुण माझेकडे दंडासह 60,000/- रूपये दया अशी मागणी केली. त्यावेळी मी त्यांना काहीतरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी त्यांनी यात काही कमी होणार नाही तुम्ही पैसे दिले नाहीतर झालेला लाख रूपये दंड तसाच ठेवणार असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना दंडाची पावती मिळणार का असे विचारले त्यावेळी ते मला पैसे दिलेनंतर बघुया असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना चार पाच दिवसात पैशाची जुळणा करून भेटतो असे सांगुन तेथुन निघुन आलो. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी आज रोजी त्यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी त्यांचे स्टाफ व पंचासह आज रोजीच जुना चंदुर रोड, दुर्गामाता मंदिर जवळ येत असल्याचे सांगुन मला तेथे येण्यास सांगितले. दिनांक 16/10/2023 रोजी नाळे साहेब त्यांचे स्टाफ चंदुर येथे आल्याचे सांगुन मला तेथे बोलवले. त्यावेळी मी तेथे जावुन त्यांना भेटुन माझी ओळख सांगुन त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. त्यावेळी साहेबांनी माझी दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून देवुन त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी तक्रार सांगितली. त्यानंतर नाळे साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन प्रथम महावितरण कार्यालयातील बिरनाळे साहेब यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना बिरनाळे यांची भेट घेणेकरीता पाठविले. मी कार्यालयात जावुन बिरनाळे यांना भेटलो त्यावेळी मला त्यांनी गाडी घ्या असे म्हणुन माझे गाडीवर बसले मला गाडी बिल भरणा करतात त्या मुख्य शाखेकडे घेणेस सांगितली. आम्ही गाडीवरून जात असताना आमच्यात माझ्या कामाविषयी बोलणे झाले त्यावेळी बिरनाळे यांनी तीस आता दया... मी पावती देतो... राहीलेले तीस नंतर दया... ते मग साहेबांना देतो सगळे, तीस इथ भरा आणि राहीलेले मी सांगितल्यावर दया असे म्हणाले त्यानंतर मी त्यांना मुख्य ऑफीसमध्ये सोडले व त्यांना भाउ पैसे

घेवुन येतोय असे सांगुन तेथुन निघुन पंच नं.01 यांना घेवुन साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर नाळेसाहेबांनी बिरनाळे यांनी माझेकडे नेमकी किती लाच रक्कम मागणी केली आहे हे पडताळणी करणे आवश्यक असलेचे सांगुन बिरनाळे यांना फोन लावणेस सांगितला. मी बिरनाळे यांना फोन लावला त्यावेळी मी त्यांना भाऊ पैसे घेवुन यायला लागला आहे पण तो तीस हजार मध्ये वरचे आकरा हजार कसले आहेत ? असे विचारत आहे असे म्हणालो त्यावेळी बिरनाळे यांनी फोन कट केला. त्यानंतर बिरनाळे यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी करणेकरीता पुन्हा मला व पंच नं.01 यांना त्यांना भेटणेकरीता पाठविले. मी बिरनाळे यांना मुख्य कार्यालयात भेटणेस गेलो त्यावेळी ते नव्हते म्हणुन त्यांना फोन लावला त्यावेळी त्यांनी मला सुदंरबागे जवळ असले ऑफीसजवळ येणेस सांगितली. त्यानंतर मी तेथे गेलो. त्यावेळी मी त्यांना दंडाची पावती करून दया असे म्हणालो. त्यावेळी बिरनाळे पावती आता नाही...साहेब मला म्हणाले पहिला साठ हजार रूपये घ्या मग एकोणीसची पावती करा असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना आता तीस हजार रूपये माझेकडे आहेत असे म्हणालो. त्यावेळी बिरनाळे यानी नाही तसे नाही... उदया डायरेक्ट साठ हजार आणुन दया...एकोणीसची पावती देतो विषय संपवुन टाकुया असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा ते मला उदया साठ देवुन टाक... मी साहेबाला कसे तरी थांबवतो असे म्हणाले. त्यानंतर आम्ही परत येवुन साहेबांना हकीकत सांगितली. पाटणकर साहेब हे कार्यालयीन वेळ झालेनंतर भेटणार नाहीत तसेच बिरनाळे यांनीही उदया बोलावले असल्याने आज रोजीची कारवाई नाळे साहेबांनी थांबवुन मला दिनांक 17/10/2023 रोजी करण्याचे सांगुन सकाळी 10.00 वाजता येण्यास सांगितले. दिनांक 17/10/2023 रोजी सकाळी 10.00 वा चे सुमारास नाळे साहेब, पंच,त्यांचा स्टाफ असे काल थांबलेल्या ठिकाणी मला भेटले. त्यावेळी साहेबांनी महावितरण कार्यालयातील पाटणकर साहेब यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना पाटणकर यांची भेट घेणेकरीता पाठविले. मी कार्यालयात जावुन पाटणकर साहेब आहेत का पाहीले परंतु ते ऑफीसला पोहचले नव्हते. म्हणुन मी व पंच परत येत असताना मला बिरनाळे यांचा फोन आला त्यावेळी त्यांनी मला विषय काय होतेय नसेल तर सांगा असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना भाऊ वांदे करत आहे असे म्हणुन आमचेत दोघांचे निम्मे निम्मे दयायचे ठरले आहे असे वगैरे बोललो. त्यावेळी मी त्यांना थोडा वेळ दया असे म्हणालो त्यावेळी त्यांनी मला वेळ देतो तुम्ही ऑफीसला या असे म्हणाले. त्यानंतर आम्ही परत येवुन साहेबांना हकीकत सांगितली. पुन्हा काही वेळाने साहेबांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना पाटणकर यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी माझ्यात व पाटणकर साहेब यांचेत मला केलेल्या दंडा बाबत व मिटर बाबत बोलणे झाले त्यावेळी त्यांनी मला मिटर बंद करणेचा अर्ज घेवुन या म्हणालेने मी व पंच नं.1 साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना हकीकत सांगितली. त्यानंतर साहेबांनी पुन्हा पाटणकर साहेब यांनी सांगितलेला अर्ज घेवुन त्यांची भेट घेण्याचे ठरवले त्यानंतर पुन्हा मला व पंच नं.1 यांना पाटणकर यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी आमचेत कामाविषयी बोलणे झाले त्यावेळीमी त्यांना बिरनाळे यांचेकडे साठ हजार रूपये देवुया का असे विचारले त्यावेळी त्यांनी मला फक्त कुठे वाच्यता करू नका असे म्हणाले. त्यावेळी तेथे बिरनाळे आले तेंव्हा आम्हा तिघांच्यात माझे कामा विषयी व मिटरबाबत बोलणे झाले त्यावेळी मी बर साहेब साठ हजारात काय कमी देवु का थोडे असे म्हणालो. त्यावेळी बिरनाळे यांनी मग सरळ एक बावीस भरा असे म्हणाले. त्यावेळी मी पाटणकर साहेबाना काहीतरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी पाटणकर साहेब यांनी मला पाच कमी करा त्यात असे म्हणाले. त्यावेळी बिरनाळे यांनी आजच्या आज ते हे करून टाका असे म्हणाले त्यावेळी मी बिरनाळे साहेबांचेकडे देवुन टाकु काय असे म्हणालो त्यावेळी पाटणकर साहेब यांनी देवुन टाका.. खर आजच्या आज विषय संपवुन टाका असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना आजच्या आज संपवतो... येवु काय असे म्हणुन मी व पंच नं.1 साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना हकीकत सांगितली. त्यानंतर नाळे साहेबांनी सापळा कारवाई सुरू केली सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण र्यवाही केलेनंतर अँथ्रासिन लावलेले 55,000/- रूपये माझे शर्टचे डावे खिशात ठेवुन रेकॉर्डर सुरू करून ते माझेकडे दिले. त्यानंतर मी व पंच नं. 01 असे माझे मोटर सायकलवरून निघालो. त्यावेळी माझे पाठोपाठ पंच नं. 02, सापळा पथक आले. मी बिरनाळे साहेब यांचे ऑफीसमध्ये गेलो त्यावेळी सापळा पथक आजुबाजुला थांबले. मी बिरनाळे यांना जावुन भेटलो त्यावेळी त्यांनी मला सगळेच आणलेत का असे विचारले त्यावेळी मी त्यांना होय म्हणालो. त्यावेळी त्यांनी मला मुख्य कार्यालयाकडे चला जावुया असे म्हणाले त्यावेळी मी व बिरनाळे माझे गाडीवरून मुख्य कार्यालयातील दंड भरून घेतात तेथे गेलो. त्यावेळी मी त्यांना हे बघा हे एकोणीस हजार रूपये दंडाचे बरोबर असे म्हणुन त्यांनी मागणी केलेले 55,000/- रूपये बिरनाळे यांचेकडे दिले. त्यांनी ते पैसे घेवुन बिल भरणा करतात त्या मॅडम यांचेकडे देवुन सीआरआयडी किती आहे बघा असे त्यांना विचारले. त्यावेळी त्या मॅडम यांनी 19,060/- रूपये असल्याचे सांगितले. बिरनाळे यांनी त्या मॅडमना किती आहेत टोटल बघा असे म्हणाले त्यावेळी मॅडम यांनी एकोणीस हजार घ्यायचे आहेत ना? असे म्हणाल्या. त्यावेळी बिरनाळे यांनी होय होय असे

म्हणाले. त्यावेळी त्या मॅडम यांनी मग ऐवढे पैसे कशासाठी असे विचारले त्यावेळी बिरनाळे यांनी ते मोजण्यासाठी दिले आहेत ओ...ते... असे म्हणाले त्यावेळी मॅडम यांनी 55 हजार रूपये आहेत असे सांगुन दंडाकरीता त्यातील 19,000/-रूपये घेवुन आमचे दोघाकडुन वरचे सुटटे 60/- रूपये घेवुन 19,060/- दंड भरून घेवुन उरलेले 36,000/-रूपये बिरनाळे यांना दिले. बिरनाळे यांनी ते पैसे घेवुन पॅन्टचे उजव्या खिशात ठेवले त्यावेळी मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच सापळा पथक तेथे आले सापळा पथक जवळ आल्यानंतर बिरनाळे यांना संशय आल्याने ते ऑफीस आवारामधुन पळुन जावु लागले तेंव्हा त्यांना सापळा पथकाने पकडुन मुख्य कार्यालयात परत आणुन सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे पुर्ण करण्यात आली. तरी मला महावितरण 'अ' उपविभागीय कार्यालय, इचलकरंजी कार्यालयाकडुन अनाधिकृत वीज वापरली म्हणुन कलम 126 प्रमाणे पाच वर्षाचा 1,22,678/- रूपये दंड झालेबाबतची नोटीस दिली होती. त्याबाबत सदर कार्यालयात तीन वेळा सुनावणी झालेनंतर सदर कार्यालयातील पाटणकर व बिरनाळे यांनी मला पाच वर्षाचा झालेला दंड कमी करून फक्त एक वर्षाचा दंड अंदाजे 19,000/- रूपये असा केला आहे असे सांगुन माझेकडे दंडाचे 19,000/- रूपये व दोघांसाठी 41,000/- रूपये अप्रामाणिकपणे स्वतःचे फायदयाकरीता मागणी करून माझ्याकडुन बिरनाळे यांनी बेकायदेशीरपणे तडजोडीअंती 36,000/- रूपये लाच स्विकारताना त्यांना अँन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने त्यांना रंगेहाथ पकडल्याने माझी 1) सुयोग दिनकर पाटणकर, वय - 47 वर्षे, पद - अतिरिक्त कार्यकारी अभियंता, (वर्ग 01) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या, 'अ' उपविभागीय कार्यालय, इचलकरंजी, रा.खासबाग मैदान जवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर मुळ रा.सोमवार पेठ, पन्हाळा, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर, 2) रविंद्र बापुसो बिरनाळे, वय-38 वर्षे, सहायक लेखापाल,(वर्ग 03)महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या, 'अ' उपविभागीय कार्यालय, इचलकरंजी रा. अमराई रोड, शिक्षक कॉलनी, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
RAJU ANANDA TAHSILDAR(I (Inspector)) / PNMH50695 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in char**
**Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची सही)**

**Name (नाव):** RAJU ANANDA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PNMH50695

ठाणे अंमलदार
शिवाजीनगर पोलीस
इचलकरंजी